# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(formerly University of Pune)

## व्यवस्थापन प्रतिनिधींची अधिसभेवरील निवडणूक

## जाहीर प्रकटन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम (२८)(२)(त)[(28(2)(p)] मधील तरतूदीनुसार संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे व्यवस्थापनाचे सहा प्रतिनिधी अधिसभेवर (Senate) निवडून देण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणीची माहिती विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर भरण्याची मुदत **दि. १९ जून, २०१७ ते १८ जुलै, २०१७** या कालावधी पर्यंत देण्यात आलेली होती. त्यानंतर सदर ऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणी करण्याची मुदत दिनांक ०३ ऑगस्ट, २०१७ पर्यंत वाढविलेली होती. व सदर माहितीची छापील प्रत व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या (विहित नमुन्यातील) प्रतीसह मंगळवार, दिनांक ०८ ऑगस्ट, २०१७ पर्यंत विद्यापीठाच्या निवडणूक विभाग येथे स्विकारण्यात आली.

त्याअनुषंगाने विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यात येऊन व्यवस्थापन प्रतिनिधींची ताप्पुरती मतदार यादी सोमवार **दिनांक २१ ऑगस्ट, २०१७** रोजी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. या अनुषंगाने प्रसिध्द केलेल्या मतदार यादीमध्ये काही आक्षेप/दुरुस्ती असल्यास त्या संबंधिताकडून **शनिवार, दि. २६ ऑगस्ट, २०१७ रोजी ६.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या संकेतस्थळावर मागविण्यात आले होते. विहित मुदतीत सादर केलेल्या अर्जाची प्रत (Printout) आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करण्याची अंतिम मुदत **गुरुवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** देण्यात आली होती. विहित मुदतीत अर्ज सादर केलेल्या परंतु अर्जामध्ये काही त्रुटी असलेल्या/दुरुस्त्या सुचविलेल्या व्यवस्थापन प्रतिनिंधींनी कागदपत्रांची मुदतीत पूर्तता केलेली असल्याने अशा व्यवस्थापन प्रतिनिधींची नावे अंतिम मतदार यादीमध्ये समाविष्ट केलेली आहेत/दुरुस्त केलेली आहेत. व्यवस्थापन प्रतिनिधींची अंतिम मतदार यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेला २०१७ चा एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ८ (७) मध्ये मतदार यादीच्या मुद्रित प्रती हया, अर्ज केल्यावर व विद्यापीठाकडून विहित करण्यात येईल अशी फी प्रदान केल्यावर कोणत्याही व्यक्तीला देण्यात येईल, अशी तरतूद आहे. सदर तरतूदीस अनुसरुन व्यवस्थापन प्रतिनिधींच्या यादीच्या मुद्रित प्रतीची फी रु. ५०/- (रुपये पन्नास) एवढी आहे. एकरुप परिनियमातील तरतूदीप्रमाणे सदर मतदार यादीच्या प्रतीची मागणी अर्जदाराने केल्यास सदरची फी चलनाद्वारे विद्यापीठाच्या बँक खात्यामध्ये जमा केल्यास सदरच्या मतदार यादीची मुद्रित प्रत अर्जदारास निवडणुक विभागामार्फत पुरविण्यात येईल.

23/9/17

(डॉ. अरविंद दि. शाळिग्राम)
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/ 134
दिनांक : 23/०९/२०१७

D:\Election 2017\Management Representetive\Note\Praktan.docx